दैनिक सेवाशक्ती टाईम्स

https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

बुलडाणा ● वर्ष:- ३ रे ● अंक:- ९१ ● पाने:- ४ ● किंमत:- २ रुपये ● RNI:- MAHMAR/2022/87884 ● शुक्रवार २३ मार्च २०२५

# या तीन बड्या नेत्यांचा आग्रह अन् मंत्रिपद मिळालं, भुजबळांनी थेट नावच घेतलं

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**




**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला राज्यात मोठं यश मिळालं होतं. मात्र त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीनं जोरदार पुनरागमन केलं. महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं, महायुतीचा राज्यात तब्बल 232 जागांवर विजय झाला तर दुसरीकडे महा विकास आघाडीला अवघ्या 50 जागांवरच समाधान मानावं लागलं, दरम्यान राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आल्या नंतर मंत्रिमंडळ विस्तारात अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली होती, तर काही अनुभवी चेहऱ्यांना डावलण्यात आलं होतं. त्यामध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांचा देखील समावेळ होता. मंत्रिपद न मिळाल्यानं गेल्या अनेक दिवसांपासून भुजबळ नाराज होते. त्यांनी अनेकदा आपली नाराजी देखील बोलून दाखवली होती.अखेर आता पुन्हा एकदा भुजबळ यांना मंत्रिपद मिळालं आहे, भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. दरम्यान त्यांनतर त्यांनी काही गौप्यस्फोट देखील केले आहेत. मागच्या मंगळवारी आमची बैठक झाली आणि तेव्हाच ठरलं होतं की शपथ घ्यायची आहे, पण मी कोणालाच नाही सांगितलं, असा गौप्यस्फोट यावेळी भुजबळ यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, मोदी साहेब आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यावेळीच सांगितलं होतं की दुरुस्त करायला पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रयत्न केले असंही यावेळी भुजबळ यांनी म्हटलं. दरम्यान छगन भुजबळ यांना आता मंत्रिपद मिळालं आहे, त्यामुळे नाशिकचं पालक मंत्रिपद कोणाला मिळणार याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. यावर देखील यावेळी भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मी पालकमंत्री नसलो तरी काम करण्याची माझी तयारी आहे, मी पालकमंत्री असलो नसलो तरी काही फरक पडणार नाही. मी नाशिकचा बालक आहे, पालक नसलो तर काय झालं? पालक मंत्रिपदाबाबत मुख्यमंत्री योग्य तो निर्णय घेतील, असंही यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे.तसेच नाशिकमध्ये मला विशेष प्रेम दिलं जात. मी नाशिकच्या लासलगाव, येवला या मतदार संघातून निवडून येतो. मागील काळात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली, असंही भुजबळ यांनी म्हटलं.पुढच्या निवडणुका आपल्याला जिंकायच्या आहेत, आम्ही जेलमध्ये अडकलो होतो तेव्हा देखील आत बसून आपले लोक सभापती केले. तुम्ही जर अजितदादांच्या जास्त जागा निवडणून दिल्या तर फयदा आहे. आता सगळ्यांना बरोबर घेऊन निवडणूक लढायची आहे. अजितदादांनी सुद्धा सांगितलं आम्ही सगळ्यांना घेऊन पुढे जाणार, सगळ्यांना सोबत घेऊन महानगर पालिका, जिल्हा परिषदेची निवडणूक लढवायची आहे. निवडणुकीत सगळ्यांना संधी द्यावी लागेल, पडला तरी चालेल पण तो घटक आपला आहे. सगळ्यांसाठी प्रयत्न करायचे तुम्ही सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत लोकांमध्ये राहायला हवं, असंही यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे.

## छगन भुजबळ काय म्हणाले ?

**अखेर आता पुन्हा एकदा भुजबळ यांना मंत्रिपद मिळालं आहे, भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. दरम्यान त्यांनतर त्यांनी काही गौप्यस्फोट देखील केले आहेत. मागच्या मंगळवारी आमची बैठक झाली आणि तेव्हाच ठरलं होतं की शपथ घ्यायची आहे, पण मी कोणालाच नाही सांगितलं, असा गौप्यस्फोट यावेळी भुजबळ यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, मोदी साहेब आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यावेळीच सांगितलं होतं की दुरुस्त करायला पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रयत्न केले असंही यावेळी भुजबळ यांनी म्हटलं.**

# माझे पती घरी नसताना हे लोक मला...; हगवणे कुटुंबीयांच्या थोरल्या सुनेचा खळबळजनक खुलासा


**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**



**मुंबई :** वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणामुळे सध्या सर्वत्र खळबळ माजली आहे. या प्रकरणात वेगवेगळी माहिती समोर येताना दिसत आहे. वैष्णवीच्या मृत्यूला जबाबदार असणारे तिचे सासरे राजेंद्र हगवणे आणि पती सुशील हगवणे अजूनही फरार आहेत. आता हगवणे कुटुंबीयांची थोरली सून मयूरी यांनी हगवणे कुटुंबीयांबाबत मोठा खुलासा केला आहे. तिने हगवणे कुटुंबीय कशी वागणूक द्यायचे याबाबत खुलासा केला आहे. हगवणेंची थोरली सून मयूरीचा लग्नाच्या दोन दिवस आधी अपघात झाला होता. त्याविषयी बोलताना ती म्हणाली, 'हगवणे कुटुंबीय माझ्या मिस्टरांना मारहाण करायचे. बायकोचा बैल म्हणायचे. तू तिची बाजू घेतो. तिच्यात हुरळून गेलाय म्हणायचे. माझं लग्न जेव्हा होतं तेव्हा दोन दिवस आधी माझा अपघात झाला होता. मी लग्नात उभं राहू शकत नव्हते. डॉक्टरांनी ऑपरेशन करायला सांगितलं होतं. मी माहेरी आल्यावर मी ऑपरेशन केलं होतं. माहेरी न येता मी सासरी राहिले तेव्हा मी वॉकरवर चालायचे. माझ्या सासूने तेव्हा माझ्यासाठी खूप केलं. पण नणदेला त्रास व्हायचा. माझ्या रुममध्ये मला जेवण आणून दिलं जात असायचं. पण नणदेने भांडण केल्यानंतर मला माझ्या खोलीत जेवण देणं बंद केलं होतं. पुढे ती म्हणाली, 'मला मारहाण झाल्यावर मी पोलिसात तक्रार केली होती आणि आई व भावाला कळवलं होतं. माझे मिस्टर नसताना हे लोक यायचे आणि मला मारहाण करायचे आणि घरात कोंडून ठेवायचे. त्यानंतर ते पोलीस ठाण्यात सर्वात आधी जायचे. आमच्याकडून गाड्या वगैरे आमच्या हक्काचं काढून घेतलं होतं. आम्ही रात्रीचा प्रवास करु शकत नव्हतो. पोलिसांनी फक्त एनसीच घेतली. पण तक्रार घेतली नाही. चेहऱ्यावरुन रक्त येत असतानाही पोलीस माझी समजूत घालत असायचे. मिटून घ्या. घरातीलच गोष्ट आहे, असं पोलीस म्हणायचे.' मयूरीची पोलिसांनी तक्रार दाखल करुन घेतली नाही. त्यांनी केवळ एनसी नोंदवला. 'एकदा ९ वाजता पोलिसांनी बसून ठेवलं ते दीड ते दोन वाजता माझी एनसी घेतली. पण एफआय आरवर त्यांनी कारवाई केली नाही. नंतर माझ्या आईवडिलां विरोधात क्रॉस कंपलेट केली होती. माझ्या आईने नणदेला मारहाण केल्याचा आरोप केला होता. चार दिवस गायब होते. नंतर परत आले. पैसे देऊन त्यांनी प्रकरण मिटवल्याचं आम्हाला समजलं. ही काय करेल. आमच्या मोठमोठ्या अधिकाऱ्या सोबत ओळखी आहेत, असं ते म्हणायचे' असा खुलासा मयूरीने केला.

# ओसाड जंगल, जळालेला बॉडी अन् हेडमास्तर बायकोचं प्लॅनिंग; पती शंतनू देशमुखच्या खुनाचा कांड कसा उघडा पडला?

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**



**यवतमाळ :** गत पाच दिवसांपूर्वी चौसाळा टेकडीजवळ अर्धवट जळालेला मृतदेह आढळून आला होता. हा मृतदेह नेमका कुणाचा, याबाबत साशंकता होती. ओळख पटविणे पोलिसांसाठी अत्यंत अवघड होते. तरीदेखील स्थानिक गुन्हेशाखेतील पोलीस पथकाने 'सूता'वरुन स्वर्ग गाठत या जळीत हत्याकांडाचा पर्दाफाश केला. या बहुचर्चित हत्याकांडात मुख्य सूत्रधार पत्नी असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असून या संपूर्ण हत्याकांडाला अनैतिकतेची किनार असल्याचे उघड झाले आहे. विशेष म्हणजे कोचिंग क्लासमध्ये येणाऱ्या विधी संघर्षग्रस्त विद्यार्थ्यांचा 'यूज'करुन अत्यंत थंड डोक्याने (कोल्ड मर्डर) जळीत हत्या कांड घडविल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

**मृतदेह जळालाले, ओळख पटत नव्हती!**

शंतनू देशमुख (32) रा. सुयोगनगर, लोहारा (यवतमाळ) असे मृत पतीचे नाव आहे. याच प्रकरणात त्याची पत्नी निधी (23) हिला पोलिसांनी प्रारंभी चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. यवतमाळ ते किटाकापरा या मार्गावरील चौसाळा शेतशिवारात 15 मे रोजी जळालेला पुरुषी मृतदेह गुराख्याच्या निदर्शनास आला. त्यानंतर ही वार्ता वाऱ्यासारखी पसरुन हा प्रकार लोहारा पोलिसांपुढे पोहोचला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शना खाली लोहारा पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी पोहोचले. जळालेला मृतदेह असल्याने त्याची ओळख पटविणे हे मोठे आव्हान पोलिसां पुढे उभे ठाकले होते. परंतु स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत साहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष मनवर यांनी 'खबरी' नेटवर्क आणि तपासी प्रक्रिया यातून या जळीत हत्याकांडाचा अवघ्या पाच दिवसात पर्दाफाश केला.

**पोलिसांना लागत नव्हता मारेकऱ्याचा शोध!**

प्रारंभी पोलिसांनी या प्रकरणात 'मिसिंग'चा आधार घेतला. मात्र या संदर्भात जिल्हाभरातच नव्हे तर इतरत्र ठिकाणी कुठलाही आधार मिळाला नव्हता. तपास प्रक्रियेचा पहिला भाग म्हणून मृत शंतनू देशमुख याची पत्नी आरोपी निधी हिला चौकशीसाठी पोलिसांनी ताब्यात घेतले. 'हैद्राबाद कस्टडी' या माध्यमातून तिची सखोल चौकशी केली गेली. परंतु तपासाचा धागा नेमका शोधून काढण्यात पोलिसांना चार दिवस लागले.

**गुललवर सर्च केलं कसं मारायचं!**

त्यानंतर मात्र या बहुचर्चित हत्याकांडाचे बिंग फुटले. पत्नीनेच अनैतिक संबंध आणि मद्यप्राशनातून विद्यार्थ्यांसमोर होणारी सततची मारहाण यातून 'गुगल'वर सर्च करुन अत्यंत थंड डोक्याने हे हत्याकांड घडवून आणल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. शंतनू देशमुख याची पत्नी निधी हिला पोलिसांनी अटक केली आहे.

# वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पहिली प्रतिक्रिया

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या पक्षातील नेते राजेंद्र हगवणे यांच्या सून वैष्णवी हिचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. आता राजेंद्र हगवणे आणि त्यांचा मुलगा सुशील हगवणे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणात अजित पवार यांनी पहिल्यांदा प्रतिक्रिया दिली आहे. आपला या प्रकरणाशी दुरान्वये संबंध नाही. मी लवकरच पत्रकार परिषद घेऊन भूमिका स्पष्ट करणार आहे, असे अजित पवार यांनी म्हटले आहे. बारामती विमानतळ माध्यमांशी बोलताना अजित पवार यांनी ही प्रतिक्रिया दिली. या प्रकरणा बाबत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली ठोंबरे म्हणाल्या, राजकीय नेत्यांना लग्नात बोलवले जाते. अनेक लग्नात राजकीय पदाधिकारी जात असतात. त्याच पद्धतीने अजित पवार यांना बोलवले गेले होते. परंतु त्या प्रकरणाशी अजित पवार यांचा काहीच संबंध नाही. या प्रकरणात अजित पवार पुणे पोलीस आयुक्तांशी बोलले आहे. या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई करण्याचे त्यांनी सांगितले आहे. या प्रकरणात कोणताही राजकीय दबाव नाही, असे रुपाली ठोंबर यांनी म्हटले आहे. दरम्यान, मनसेच्या नेत्या शालिनी ठाकरे यांनी अजित पवार यांना प्रश्न विचारला होता. त्या म्हणाल्या होत्या, हुंड्यात देण्यात आलेली फॉर्च्यूनर गाडी हगवणे कुटुंबाला देताना आपण राज्याचे उपमुख्यमंत्री आहात हे विसरला होतात का? असा प्रश्न शालिनी ठाकरे यांनी उपस्थित केला होता. छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत अजित पवार यांनी आपले वर्चस्व सिद्ध केले. अजित पवार यांच्या पॅनलने सर्व २१ जागांवर विजय मिळवला होता. मतदारांचे आभार व्यक्त करण्यासाठी आणि छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकी संदर्भात अजित पवार यांनी गुरुवारी सभा घेतली. या सभेतून थेट भाजपला इशारा दिला. भाजपचे जे काही मतदारसंघ आहेत. तिथे देखील माझे कार्यकर्ते आहेत. मी देखील त्या मतदारसंघात लक्ष घालेल, असे अजित पवार यांनी म्हटले.

## अजित पवार काय म्हणाले ?

**मी फक्त लग्नाला उपस्थित होतो. माझा काही संबंध नाही. नालायक माणसे माझ्या पक्षात नको. त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षातील लोकांनी चूक केली तर माझा काय संबंध आहे. फरार असलेल्या हगवणे यांना शोधण्यासाठी पोलिसांची पथके वाढवली आहे. आता कुणाच्या लग्नाला गेलो तर अशी आफत येते. त्यामुळे कुणी लग्नाला नाही आले तर नाराज होऊ नये. वैष्णवी आणि शशांक यांचे लव्ह मॅरेज होते. वैष्णवीच्या हट्टामुळे हे लग्न थाटामाटात झाले होते. या लग्नासाठी शंशाक याच्याकडून फॉर्च्यूनर गाडीचा मागणी झाली होती. तसेच सोन्याची मागणी देखील झाली होती. एक लाख 20 हजाराचे घड्याळ मागितले होते. लग्नात फॉर्च्यूनर गाडी अजित पवार यांच्या हस्ते देण्यात आली होती. त्यावेळी अजित पवार म्हणाले होते, राजाभाऊंनी तुमच्याकडे गाडी मागितली की, तुम्ही दिली, अशी माहिती वैष्णवीचे मामा उत्तम बहिरट यांनी दिली.दरम्यान, मनसेच्या नेत्या शालिनी ठाकरे यांनी अजित पवार यांना प्रश्न विचारला होता. त्या म्हणाल्या होत्या, हुंड्यात देण्यात आलेली फॉर्च्यूनर गाडी हगवणे कुटुंबाला देताना आपण राज्याचे उपमुख्यमंत्री आहात हे विसरला होतात का? असा प्रश्न शालिनी ठाकरे यांनी उपस्थित केला होता.**

## अग्रलेख

## - वाढदिवस का साजरा करतो? -



आपण वाढदिवस का साजरा करतो?सिरीअसली का साजरा करतो आपण आपल्याच जन्मदिवसाचा सोहळा?करतो तर करतो .. ईतरांनीही त्यात सामील व्हावे, आपले अभिनंदन कौतुक करावे अशी अपेक्षा का करतो?लग्नाचा वाढदिवस साजरा करणे समजू शकतो.आणखी एक वर्ष लग्न टिकवले, आणखी एका वर्षाचा संसार झाला..पण असा काय तीर मारला आपण, एखाद्या अमुक तमुक दिवशी जन्म घेऊन?आणि त्या दिवसाला आज अमुकतमुक वर्षे होऊन..बस्स जगलो एवढेच !ते तर किडे मुंग्याहीजगतातच की..फरक ईतकाच,ते किड्यामुंग्यांसारखे जगतात आणि आपण माणसांसारखे जगतो. बास्स !पण मुळात कधी कुठे केव्हा कसे जन्मावे हे आपल्या हातात असते का...करायचेच झाल्यास आपल्याला जन्म देणाऱ्या आईवडीलांचे अभिनंदन करणे जास्त योग्य नाही का..शेवटी त्यांचेच तर प्रॉडक्ट एक वर्ष आणखी टिकले असते. आता साजरा करणे आले म्हणजे पार्टी आली. केक आला. दारू आली.जमलेच तर नाच आणि धिंगाणा आला.या सर्वांचे फेसबूकवर फोटो टाकून त्यावर आणखी शेकडो लोकांचे कौतुकाचे आणि अभिनंदनाचे पोस्ट मिळवणे आले...

झालेय माझेही हे सारे करून..

मग एके वर्षी मी फेसबूकची सेटींग चेंज केली.माझा वाढदिवस मी सोडून कोणालाच दिसणार नाही याची खात्री केली.आणि मग त्या दिवशी मला समजले..मी सोडून माझ्या बर्थ डे बद्दल कोणालाच पडली नव्हती ..अगदी कोणालाच पडली नव्हती.. नॉट ए सिंगल विश .. ब्लडी नॉट ए सिंगल विश ..दुसऱ्या दिवशी मी फेसबूक अकाऊंट डिएक्टीवेट केले ..हे सगळे मला आजच का आठवले..कारण पुढच्याच आठवड्यात माझ्या गर्लफ्रेंडचा बर्थडे आहे.. आणि तिची अशी अपेक्षा आहे की मी त्या दिवशी सुट्टी टाकावी.. जे मला वर्कलोडमुळे जमणे अवघड आहे !काय सांगू आता बॉसला..ऑफिसच्या मिटींग पेक्षा माझी आजची डेटींग महत्वाची आहे.

जिच्याबरोबर सेटींग झालीय ती महत्वाची आहे. एवढी हिंमत कदाचित होणार नाही सांगायची ..

पण ऑफिसला दांडी जरूर मारणार...उडत गेले ऑफिस

आणि तेल लावत गेला बॉस,

तिच्यासाठी मी एवढे जरूर करणार..

का माहितेय ..कारण बदललेल्या

फेसबूक सेटींगला चकवून,

ठिक आदल्या रात्री बारा वाजता,

माझा जन्म दिवस उजाडल्या उजाडल्याच..


त्याचे सार्थक करायला..




अकोला ब्रेकिंग अकोल्याचे नवीन जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक तर जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंग यांची नागपूर येथे बदली स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक जाहीर होण्याआधीच राज्यातील बदल्या पोलीस अधिकाऱ्याच्या बदल्याच्या धडाका सुरु झाला आहे राज्यात आठ आयपीएस अधिकाऱ्याच्या बदल्या करण्यात आल्या होत्या त्यानंतर गुरुवारी 21 वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत पोलीस प्रशासनच्या निर्णयाने राज्यातील अनेक जिल्हाना नवीन पोलीस अधीक्षक मिळाले आहेत..

## - पर्यावरणीय शिक्षणाचे महत्त्व -

पर्यावरण ऱ्हास थांबवणे ,थोपवणे,ही अन्य कुणाची तरी जबाबदारी आहे असं प्रत्येकच व्यक्ती समजत असते .खरंतर पर्यावरणाच्या रक्षणाची निसर्गाच्या ऱ्हासाची वाढ थांबवण्याचे सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून करायला हवी. ते शिक्षण सर्वांना द्यायला हवं .गेले काही वर्षापासून आपल्या पृथ्वीवर पर्यावरणाचा ऱ्हास झपाट्याने होत आहे. ग्लोबल वॉर्मिंग आणि ओझोन लेअरला भोक पडणं हे अतिशय धोकादायक संकेत आहेत .जोशी मठच्या घरांना जाणारे तडे, केदारनाथ ला झालेली दुर्घटना, अनेक दर्डी कोसळणं माळीनिंग सारखं एखादे पूर्ण गाव वाहून जाणं भयानक आहे. निसर्ग जणू काय, आपल्याला ,'मला वाचवा' अशी हाक देतो आहे. त्या पृथ्वीचं त्या र्हासापासून आपल्याला रक्षण करायचं आहे .मुंबई शहरातील,या बेटावर ,समुद्र हटवून अनेक इमारती बांधल्यामुळे, समुद्राचे पाणी बेफाम होऊन अन्यत्र पसरणे धोक्याची घंटा आहे.सुनामी येण भूकंप होण या गोष्टी पर्यावरणाची चिंताजनक स्थिती दर्शवतात. खरं सांगायचं तर जंगल हे पर्यावरण रक्षणाचे मोठे साधन असते .पण त्याऐवजी मानवाने सिमेंट जंगल वाढवली आहे .आजच्या या सिमेंटच्या जंगलामुळे ते पाणी जमिनीत मुरायच्या ऐवजी वाहून जात आणि त्यामुळे पर्यावरणाचे असंतुलन वाढु शकतं .पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी माझ्यासारखी सामान्य व्यक्ती काय करू शकते ? प्रत्येक व्यक्ती पर्यावरणाचा र्हास थांबवण्यासाठी आपापला खारीचा वाटा नक्कीच उचलू शकते.याचे शिक्षण बालवयापासून मृत्यूपर्यंत द्यावे 1 )झाडे लावून पक्षी वाचवु या: माणसाचा, पक्षी जगताशी संबंध तर बालपणापासूनच असतो. लोकमान्य टिळकांना जेलमध्ये चिमण्या चिवचिवाट करून सोबत करत असत असा देखील उल्लेख आहे . पंचतंत्रानुसार पक्ष्यांना पारंपरिक ज्ञानाचा खजिना मानलं जातं . पक्षी घरटे सुद्धा आजूबाजूचा परिसर आणि माणसं आपल्याला त्रास देणार नाहीत नाही बघूनच बांधतात. ती आपल्या अंड्याचा आणि कोवळ्या पिल्लांचा नेटीने सांभाळ करते.लोककथांमध्ये सुद्धा ,सर्व सजीवांना चतुर आणि हुशार अशी सामान्य व्यक्ती मानलं जातं. बालकांना आता दाखवायला सुद्धा चिमण्या दुर्लभ झालेल्या आहेत.त्यामुळे मला हे पक्षी वाचवायचे आहेत.2 मानवी लोकसंख्या वाढली आणि घराची गरज वाढल्यामुळे ,माणसांच्या अधिवासासाठी अन्यांचा अधिवास नष्ट झाला.(झाड तोडली,जंगल हटवली) पर्याय आणि परिणामाने प्राण्यांचा आणि किटकांचा देखील अधिवास धोक्यात आला.मी याबाबत जनजागृति केली. .3 प्रगती?:मानव मोठा झाला ,मोबाइल टॉवर वाढले.त्या कंपनांनी पक्षी दूर उडाले.मानव शहरात आला की त्याच्या जबाबदाऱ्या,मागण्या आणि हाव वाढते .गाडी हवी .गाडी पार्किंगला जागा हवी .म्हणून झाड तोडली जातात, आणि झाडावर अवलंबून असलेले अनेक पक्षी प्राणी कीटक नष्ट होतात. मी गाडी वापरण्या ऐवजी,public transport वापरते इंधन बचत होते आणि पर्यावरणाचा ऱ्हास थांबतो4 लोकसंख्या आटोक्यात आणणे अतिशय आवश्यक आहे. मी त्या बाबतीत जनजागृती करते आणि त्या विषयावर सतत लिखाण करते5 पाणीटंचाई: सिमेंटचे आवार आणि रस्ते,यामुळे पाणी झिरपत नाही.झाड झुडप कमी झाली.अवकाळी पाऊस,तापमान वृध्दी हा त्या झाड तोडण्याचा दुष्परिणाम आहे. जंगल वाचवू या ऊन वाढले डोक्यावर, झाडे पाण्याने शिंपु या, हिरवे डोंगर वाचवु या !जंगल वाचवायचे दिवस आणि झाडे लावायचे दिवस हे वर्षातले बारा महिने 13 काळ असतात .6 plastic टाळणे:मी बाहेर जाताना हमखास तांब्याची अथवा स्टीलची पाण्याची बाटली,डबे नेते. ज्यामुळे प्लास्टिकच्या बाटल्यांचे प्रदूषण पण होत नाही आणि हे नेलेलं पाणी मी वाटेत सुकत चाललेल्या एखाद्या झाडाला घालते .7आपण मात्र सिमेंटच्या जंगलाच कौतुक अधिक करतो.एकाच झाडाला लागेल,एवढ्या जागेत,उभी,मियावाकी पद्धतीने,उभी/कमानीदार झाडे लावायला हवी.मी तशी लावते. हवेतील ऑक्सीजन वाढतो,सजीव सहजीवन वाढते. 8 या फळझाडांवर पक्षी येतात. फुलांचं परागीकरण करण्यास देखील पक्षी उपयोगी पडतात.पक्षी कीटक खातात म्हणून शेतात किडीचा प्रादुर्भाव कमी होतो. फळ आपल्याला खाता येतात.7झाड नाहीत, तर मानवाला अन्न नाही . झाडं नसल्यामुळे आणि मानववस्ती दाट झाल्यामुळे,तापमान वाढले. पर्यावरणाचा ऱ्हास होतो आहे. पर्यावरण शिक्षणाने हे समजू शकते8 मी घरून जाताना नेहमी कापडी पिशवी नेते प्लास्टिकचे डबे वापरत नाही प्लास्टिकच्या बाटल्या वापरत नाही त्या ऐवजी स्टीलचीच बाटली आणि स्टीलचे डबे वापरते8 पाणी वाचवण्यासाठी सुद्धा प्रयत्न करायला हवा हे मी सर्वांवर ठसवते. जल हे जीवन आहे! जल जो न होता तो ये जग जाता जल! म्हणजे पाण्या वाचून किती जगात मुश्किल होईल हे आपल्याला कळायला हवं .असं म्हणतात पुढचं महायुद्ध पाण्यावरून लढले जाईल.आज इतकी पाणी बचतीची आवश्यकता आहे .मी करते.जलसंवर्धन, निसर्गचक्रातलं त्यांचं महत्त्व याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी कार्यक्रम, उपक्रम आयोजित करते.9 वीज निर्मितीमध्ये सुद्धा प्रचंड ऊर्जा ऱ्हास होत असतो कारण की एका ऊर्जेतून दुसऱ्या ऊर्जेमध्ये परावर्तित करून वीज बनत असते . या प्रक्रियेमध्ये कार्बन फुटप्रिंट येत असतं .त्यामुळे विजेची बचत करावी.मी करते .10 रिन्यूएबल एनर्जी चा उपयोग करावा त्यात सोलर आणि विंड एनर्जी या दोन गोष्टी विनामूल्य आहेत .योग्य तो तकनीकी बदल करून सुधारणा करून आपण विजेचा वापर कमी करू शकतो.11सूर्यप्रकाशाच्या वापरावर अन्न शिजवणाऱ्या सौर्य चुली अथवा सौर्य कुकर सोलर कुकर वापरावे. सोलर दिवे वापरावे मी याबाबतीत भरपूर जनजागृती करते.माझ्या घरी सुद्धा मी सोलरचा दिवा आणून ठेवला आहे .जो इन्व्हर्टर ऐवजी लाईट जाताच आपण वापरू शकतो.12सोसायटीमध्ये सुद्धा ,म्हणजे रहिवासी संकुलात सुद्धा मी वारंवार आपल्या बिल्डिंगचीचे सर्व लाईट हे सोलरवर करावे .13 कुठल्याही कार्यक्रमाच्या वेळी भेटवस्तू देताना मी झाडाचे रोप द्यायचा प्रयत्न करते किंवा कुंड्या पक्ष्यांना आंघोळ करण्यासाठी वेगळ्या वेगळ्या प्रकारची मातीची भांडी , अन्य पक्षांना खाद्य देण्यासाठी बर्ड फिडर ,कृत्रिम घरटी भेट देते.14 मानवी वस्ती ग्रामीण आणि शहरी भागात देखील पाणी बचत करण्याचे संदेश देते.तसे प्रयत्न सुरू झाले आहेत.15 एकूणच पर्यावरणाचे ऱ्हास थांबवण्यासाठी काही संस्थांचे कार्यक्रम असतात .अशा अनेक प्रकल्पात स्वयंसेवक म्हणून पर्यावरणीय शिक्षण द्यावे.16 झाड लावले,कि जगवते.17 मियावाकी या पद्धतीमुळे झाडांना पाणी कमी लागतं आणि तशी लागवड सुरु झाली आहे.18 देशी झाडं आहेत जी हजारो वर्ष ह्या,देशी मातीशी तडजोड करून जगत आहेत. त्या झाडांच्या वाढीमुळे प्राणी पक्षी आणि कीटक ही लोकल इकोसिस्टीम,मी वाढवते. झाडांशी माणसाचं सांस्कृतिक आणि भावनिक पण नातं असतं .19 त्यामुळे आधी झाड आणि जंगल वाचवलं की आपोआपच मधमाशा,जनावर, वाघ सिंह चिमण्या कीटक वाचवले जातील. निसर्ग /जंगल वाचवू या म्हणजे पक्षी वाचवले जातील . 20 अन्न सुरक्षा:मधमाशा फळफुलं झाडांची पाने,भाज्या या सर्व गोष्टींची वृद्धी ,ही समृद्ध अधिवासावर अवलंबून आहे .या निसर्ग सहकाराने बनवणाऱ्या पदार्थांवरून माणसाचे अन्न बनत .21 निसर्ग माणसाला आवाज देत असतो आणि निसर्गाच्या आनंददायी सहवासातील ,छोटा मोठा आनंद माणूस घेतो.सहली,सुट्टीत फक्त निसर्ग रम्य सहली कराव्यात जंगल बचाना है ,जंगल मे बैठना है ,जंगल मे पेड लगाना है,जाकर उस मिट्टी को छुना है !22 विद्यार्थ्यांमध्ये ,पुढील पिढीमध्ये निसर्ग पर्यावरण शिक्षण रक्षण बद्दल जागरूकता निर्माण व्हायला पाहिजे.23 मी एकदा अमेरिकेत बघितलं होतं ,खड्डा खणून त्या खोदलेल्या खड्ड्यात पाणी साचवतात आणि बाजूच्या झालेल्या मातीच्या ढिगाऱ्यावर अन्य झाडे लावता येतात. ज्यामुळे रेन वॉटर हार्वेस्टिंग पण होतं आणि झाड पण अधिक चांगली जगतात.तसा सल्ला मी देते.24 क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे. नुसतं घोषणा करुन,पर्यावरण वाचवा हे ईतरांना सांगून उपयोग नाही. प्रत्येकाने पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्याची सुरुवात स्वतःपासूनच करायला हवी .काय करावे?1 चिमण्यांसाठी अंगणात पाणी ठेवायला हवं.बाजरी,भात काही खायला ठेवावे.3 Bird feeder सांगा.4 पक्ष्यांसाठी असलेली कृत्रिम घरटी टांगावी .5भेट वस्तू देताना झाडांची रोप पक्षांना आंघोळ करण्याची /पेय जलाची भांडी, पक्ष्यांसाठी बर्ड फिडर अथवा कृत्रिम घरटं या वस्तू भेट देत जाव्या .6 भेट देतानाच कुंडी सकट देशी झाड द्यावं .म्हणजे एक जरी झाड वाढलं तरी तेवढे पर्यावरणाला फरक पडेल. 7 फिरायला,सकाळ फेरीला जाताना,बाटलीतून पाणी न्यावे,झाडांना घालावे8 सहलीला जाताना बी बियाणे न्यावे,अन्यत्र पेरावे.9 वेगवेगळी झाडे लावायला हवी . कायम सोबत स्टीलची पाण्याची बाटली आणि कापडाची पिशवी सोबत ठेवावी म्हणजे प्लास्टिकचा वापर टाळता येतो रहिवासी संकुलांमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग म्हणजे पावसाचे पाणी साठवण्याची पद्धती सुरू करावी पाणी पुनर्वापर करून वापरावे ज्याने पाण्याची बचत होईल कचऱ्याचं ओला कचरा सुका कचरा असं वर्गीकरण करून कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी निसर्गाला मित्र समजून सहकार करत समृद्ध ठेवायला हवं.निसर्गाची हाक मी मनापासून ऐकली आहे आणि पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी पर्यावरणीय शिक्षण महत्त्वाचे आणि आवश्यक आहे.










दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831

Title code :- MAHMAR52107

# पाथरी नगरपरिषदेच्या असुविधामुळे इंदिरानगर ची जनता वंचित झाली आहे

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहेमद अन्सारी.**

**पाथरी :** ढालेगाव बंधारा येथे पाण्याचा मुबलक साठा उपल असतानाही व पाथरी शहरात इतर ठिकाणी सुरळीत पाणीपुरवठा होत असताना देखील इंदिरानगर येथे आठवड्यातून एकदा व फक्त पाऊण तास पाणी सोडण्यात येत आहे.यामुळे सदरील ठिकाणच्या नागरिकांची खूप मोठ्या प्रमाणात हेडसान होत आहे व नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. तसेच आपल्या कार्यालयाचे सफाई कर्मचारी इंदिरानगर परिसरात साफसफाई साठी येत नसल्यामुळे सर्वत्र खूप मोठ्या प्रमाणात घाणीचे व दुर्गंधीचे प्रमाण वाढलेले असुन नाल्या तुंबलेले आहेत व सदर नालीचे घाण पाणी हे घरात वा घरा समोरील समोरील रस्त्यावर येत आहे,यामुळे आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. मुख्य अधिकारी नगर परिषद पाथरी यांना विनंती करण्यात येते की त्वरित संबंधित विभागास आदेशित करून शहरातील इंदिरानगर या परिसरात सुरळीत पाणीपुरवठा करून किमान 2 ते 3 तास पाणी पुरवठा करण्यात यावा व साफ सफाई कर्मचाऱ्यांना नियमित पाठवून तुंबलेले नाल्या व घाण साफ करण्यात यावी अन्यथा भविष्यात अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती कडून लोक शाही मार्गाने आंदोलन तथा उपोषण करण्यात येईल, असे ह्या निवेदना मार्फत नगर परिषद पाथरी कार्यालयात विनंती केली. नगरपरिषद पाथरी कार्यालयात निवेदन देताना, अनवर खान (जिल्हा अध्यक्ष, अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती परभणी) समाजसेवक असलम अतार, समाजसेवक सोहेल अहेमद आतार, समाजसेवक नदीम पाशा शेख, नसीर बेग, सोहेल मु.आतार, अकबर शेख, सत्तार शेख, इरफान शेख, लालू शेख आणि ई.उपास्थित होते.



# कलेक्टर महोदयांच्या सोबत कॉफी घ्यायची का ? मग 500 जलतारे पूर्ण करा ना ?


**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**



**वाशिम :** प्रत्येकाच्या मनात काहीतरी मोठं करून दाखवायचं स्वप्न असतं. समाजात आदराने पाहिलं जाणारं स्थान, लोकांच्या आयुष्यात बदल घडवण्याची संधी आणि जबाबदारीची जाणीव – हे सगळं एकत्रितपणे लाभतं ते आयएएस अधिका ऱ्यांच्या रूपाने. त्यातही जिल्हा धिकारी, म्हणजेच कलेक्टरचं पद, हे सर्वाधिक आकर्षणाचं केंद्र असतं. एकूणच जिल्ह्याचा कारभार सांभा ळणारा, संकटाच्या वेळी पुढे सरसा वणारा, आणि विविध विकास कामांचा शिल्पकार म्हणून ओळख निर्माण करणारा कलेक्टर हा तरुण पिढीच्या दृष्टीनं 'रोल मॉडेल' ठरतो. त्यामुळेच या पदाला सर्व स्तरांतून विशेष मान्यता आणि भुरळ असते. आता वाशिम करांना कलेक्टर महोदयां समवेत कॉफी घेण्याचा सुवर्णयोग साधता येणार आहे. होय हे खरं आहे...! जिल्ह्यात जलसंवर्धना साठी सुरू असलेल्या 'जलतारा' अभि यानात उल्लेखनीय प्रगती करणाऱ्या गावांसाठी एक विशेष सन्मान दिला जाणार आहे. ५०० किंवा त्याहून अधिक जलतारे पूर्ण करणाऱ्या सन्माननीय सरपंच , उपसरपंच, तलाठी , ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, पोलिस पाटील,ग्राम रोजगार सेवक,वॉटर हिरो यांना जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्यासमवेत जिल्हाधिकारी कार्यालयात 'Coffee with Collector' या विशेष कार्यक्रमात सहभागी होता येणार आहे.हा कार्यक्रम २६ मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. यात सहभागी होण्यासाठी दि. २४ मे २०२५ पर्यंत ५०० जलतारे पूर्ण करून त्यांचे जीओ–टॅग करणे अनिवार्य आहे.ही संधी जलतारा कार्यात पुढाकार घेतलेल्या ग्रामपातळी वरील अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आहे. जिल्ह्यातील जल संपत्तीची प्रभावी व्यव स्थापन करण्याच्या दृष्टिकोनातून हा उपक्रम एक प्रेरणादायी पाऊल ठरणार आहे.हे निश्चित...!

# नळदुर्ग शहरात सावरकर - होळकर जन्मोउत्सव निमित्त रक्तदान शिबाराचे आयोजन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अजित चव्हाण.**




**नळदुर्ग :** नळदुर्ग शहरात ब्राह्मण समाज संघटनेच्या वतीने येत्या 28 मे ला महान देशभक्त स्वा.वि.दा. सावरकर यांच्या जयंती निमित्त व तसेच पुण्य श्लोक राजमाता अहिल्या देवी होळकर यांच्या 300 व्या जयंती निमित्त सावरकर–होळकर जन्मोउत्सव एक त्रितपणे साजरा करण्यात येणार आहे. यनिमित्ताने 28 मे रोजी सकाळी 10 ते 2 या वेळेत नळदुर्ग येथील मल्लिकार्जुन मंदिर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या रक्तदान शिबिराचे उदघाटन धाराशिव भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुल कर्णी यांच्या हस्ते होणार आहे. नळदुर्ग शहरात ब्राह्मण समाज संघटनेने अनेक सामाजिक व धार्मिक कार्यक्रमाचे आज पर्यंत आयोजन केले होते. सावरकर – होळकर जन्मो उत्सव एकत्रितपणे साजरी करण्याचा निर्णय हा समाजाला दिशा देणारा आहे. सकाळी 10 वाजता या दोन्ही महापरुषांच्या प्रतिमेचे पूजन होईल व रक्तदान शिबिरास सुरुवात होईल. तरी जास्तीत जास्त तरुणांनी या रक्तदान शिबिरात सहभागी व्हावे व कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन ब्राह्मण समाज संघटनेचे अध्यक्ष व माजी नगर सेवक विनायक अहंकारी, संघटनेचे सचिव मुकुंद नाईक व उपाध्यक्ष प्रदीप ग्रामो पाध्याय यांनी केले आहे.

# श्री गुरु दत्ताच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा कळस स्थापना

**सेवाशक्ती टाईम्स.**
**समाधान सरकटे.**



**मेहकर :** श्री गुरुदत्त यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व कळस स्थापना पारडा तालुका मेहकर येथे दिनांक 28 मे रोजी होणार असून त्यानिमित्ताने तीन दिवसीय विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या मंदिराची संपूर्ण काम हिम्मतराव शिंदे यांनी केले असून यामधीलश्री दत्त मूर्ती पंजाबराव बिल्लारी महाराज यांच्या सौजन्याने आहे.दिनांक 27 /5/2025 ते 29/5/2025 तीन दिवसीय दत्त नाम सप्ताह सकाळी आनंद काकडा भजन 4 ते 6 ज्ञानप्रकाश बाळक्रीडा संगीत कथा 11 ते 2 सायंकाळी 6 ते 7 आनंद पाठ रात्री 9 ते 11 दत्त सांप्रदायिक किर्तन तीन दिवस संगीत कथा श्री द.भ.प. पंजाबराव गुलाबराव बिलारी महाराज यांची राहील.दिनांक 27/5/2025 ला दुपारी 4 वाजेनंतर गावामध्ये मूर्ती मिरवणूक होईल रात्री द.भ.प. श्री शिवाजी महाराज टाकळीकर नांदेड यांचे कीर्तन होईल दिनांक 28 /5/2025 रोजी सकाळी होम हवन मूर्ती प्राणप्रतिष्ठा कळसस्थापना श्री प.पु.अमोलानंद स्वामी सच्चिदानंद आश्रम सावत्रा आणि श्री प.पु. मोहनराज भारती आनंदमठ माहूर यांचे हस्ते होईल. रात्री नऊ वाजेनंतर श्री गुरुदत्त प्रभूची महापूजा श्री मोहनराज भारती महाराज आनंदमठ माहूर यांचे हस्ते होईल. दिनांक 29 /5 /2025 रोज शुक्रवारला सकाळी 10 ते 12 काल्याचे किर्तन श्री अमोलानंद स्वामी यांचे होईल आणि नंतर महाप्रसाद राहील तीन दिवस अखंड दत्त नाम चिंतन होईल .या मधे भजनी मंडळ पारडा, चोंढी, धानोरा ,बाळसमुद्र, वरदडी ,मोहदरी, राजनी ,सावंगीवीर, गोरेगाव ,उमाळी तालुका मलकापूर खेरडा खुर्द तालुका जळगाव जामोद पिंपराळा तालुका खामगाव भजनी मंडळ दत्त सांप्रदायिक मंडळी आणि खंडेराज आश्रम साबरा तसेच सावत्रा येथील आनंद सांप्रदायिक मंडळी कार्यक्रमांमध्ये सहभागी राहणार असून संपूर्ण भावीक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान पारडा गावकऱ्यांनी केलेआहे.

# प्रतिभावंत युवक घडविणारे भोरटेक निवासी शिबिर संपन्न
## त्यागमूर्ती वासुदेव महाराज शास्त्री संस्काराचे विद्यापीठ हभप अमोल महाराज वक्ते

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**



**- महाराष्ट्रातील प्रख्यात कीर्तनकारांचे मार्गदर्शन -**

22 दिवसीय निवासी शिबिरामध्ये महाराष्ट्र सरकारचा ज्ञानोबा तुकोबा पुरस्कार प्राप्त गुरुवर्य संजय महाराज पाचपोर, वारकरी भूषण हभप वासुदेव महाराज शास्त्री,प्रबोधनकार सतीशचंद्र रोठे पाटील,हभप रामभाऊ महाराज झांबरे, नांदुरा, हभप शिवदास महाराज राहणे पानेरा, हभप मोहन महाराज गारमोळे लासुरा, हभप गोपाल महाराज कचोरे, डिडोळा, यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.

**- दैनंदिन अध्यापकांचे सेवा कार्य -**

हभप योगेश महाराज किन्होळकर,भक्तीमती जयाताई सातव जयपुर, हभप सौरभ थोरगन,हभप विठ्ठल महाराज काळे राहुड,हभप माधव महाराज आढाव लासुरा,हभप रोहित महाराज देवरे जयपूर, निनाजी महाराज खोडके भाडगणी, यांनी दैनंदिन सेवा दिली.

**- यशस्वीतेसाठी अथक परिश्रम -**

समाधान पाटील, सौरभ थोरगन,ओंकार पाटील, प्रल्हाद मधुकर राऊत,दिनकर पाटील, विलास सांबारे,सतीश पाटील, कैलास घाटे, शिवशंकर चोपडे, नळगंगेश्वर सेवाधारी भोरटेक, मधुकर दिनकर पाटील, विनोद मख, पंजाबराव घाटे, रामभाऊ मिरगे, निनाजी दळवी, विष्णू शंकर घाटे, विलास संबारे. यासह नियोजन समिती सदस्यांनी 22 दिवस अथक परिश्रम घेतले.

**- यशस्वीतेसाठी अथक परिश्रम -**

समाधान पाटील, सौरभ थोरगन,ओंकार पाटील, प्रल्हाद मधुकर राऊत,दिनकर पाटील, विलास सांबारे,सतीश पाटील, कैलास घाटे, शिवशंकर चोपडे, नळगंगेश्वर सेवाधारी भोरटेक, मधुकर दिनकर पाटील, विनोद मख, पंजाबराव घाटे, रामभाऊ मिरगे, निनाजी दळवी, विष्णू शंकर घाटे, विलास संबारे. यासह नियोजन समिती सदस्यांनी 22 दिवस अथक परिश्रम घेतले.

**मोताळा :** पृथ्वी तलावरील काल्याचे किर्तन आणि काल्याचा महाप्रसाद श्रीकृष्णांच्या आत्म चरित्रातील सर्वोत्कृष्ट मानवतेचा संदेश आहे. लहान, मोठे, थोर सर्वांना एकत्र घेऊन स्नेहभोजन करण्याचा काला समानतेचा संदेश देणारा आहे. भगवंत उच्च नीच्य न पाहता भक्तांच्या भक्ती भावाला प्राधान्य देतो. त्याचप्रमाणे महा राष्ट्रातील सुसंस्कार पेरण्याचे एकमेव विद्यापीठ म्हणजे त्यागमूर्ती वारकरी भूषण वासुदेव महाराज शास्त्री आहे.असे मत हभप अमोल महाराज वक्ते तांदूळवाडी यांनी व्यक्त केले.श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज बहुउद्देशीय शिक्षण संस्था वाघजाळ,तथा श्री नळगंगेश्वर महादेव मंदिर भोरटेक द्वारा आयोजित भोरटेक येथील सुसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी 22 में ला अमोल महाराजांनी उपरोक्त मत व्यक्त केले. यावेळी वारकरी धर्मपिठावर त्यागमूर्ती कैवल्यमूर्ती हभप वासुदेव महाराज शास्त्री,सूर्य मंदिर जयपुर संस्थांनचे भगवानदास महाराज, प्रबोधनकार ॲड सतीशचंद्र रोठे पाटील, वारकरी साहित्य परिषदेचे जिल्हा ध्यक्ष हभप गजानन महाराज गायकवाड, हभप रामभाऊ महाराज झांबरे, माधव महाराज आढाव लासुरा, वेदांत महाराज टप लासुरा, विष्णु महाराज हिवरखडे वडोदा, अनिकेत महाराज जंगले मोरखेड, तेजस महाराज आदींची उपस्थिती होती.सर्वप्रथम हभप अमोल महाराज वक्ते यांच्या काल्याच्या कीर्तनाने निवासी शिबिर समारोपय कार्य क्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी धर्म, संस्कार, संस्कृती अनुषंगाने विचार व्यक्त केले. शिबिरामध्ये सहभागी राज्यातील 80 विद्यार्थ्यांना टाळ, मृदंग, पाऊली, हरिपाठ, किर्तन, प्रवचन, गीता, संस्कृत आदी विषयांमध्ये एक ते तीन क्रमांक देत प्रमाणपत्र स्मृति चिन्ह देऊन गौरविण्यात आले. दीपक शेळके भोरटेक, भाऊराव पाटील खराटे शेलापुर, निलेश रत्नपारखी, गजानन हरिभाऊ चोपडे डिडोळा, निनाजी माधव बुडूखले भोरटेक, गावकरी मंडळी चिंचपूर, बाळू पाटील मापारी रिधोरा, घनश्याम शेठ चांडक मोताळा, समस्त गावकरी मंडळी मोरखेड, विष्णू घाटे पिंपळपाटी, गजानन सुरपाटणे रोहिणखेड, भागवत शालिकराम घोंगटे मलकापूर, हरिदास महाले गुरुजी ज्ञानगंगापूर, समस्त गावकरी मंडळी डिडोळा खुर्द, राजेश राजाराम वनारे शिरवा, प्रल्हाद भास्कर किनगे भोरटेक, गणेश दयाराम मापारी चिंचपूर, कौतिकराव माणिकराव जुनारे मोताळा, श्रीकृष्ण पाटील शेलापुर खुर्द, प्रल्हाद पाटील गुरुजी मूर्ती, रतन लालाजी वर्मा मलकापूर, कैलास हरिश्चंद्र घाटे पिंपळपाटी, समस्त गावकरी मंडळी शेलापूर बुद्रुक, अनंता एकनाथ हिवाळे वाघजाळ, चेतन मापारी मलकापूर,मधुकर दिनकर पाटील भोरटेक, समस्त गावकरी मंडळी डिडोळा, गणेश बढे सारोळा पीर, मुक्ताई महिला मंडळ वाघजाळ, मनोहर सुपळा गवळी भोरटेक, तहसील निलेश उचाडे खामखेड, डॉ.सुभाष तलरेजा, हितेश संचेती मलकापूर, रामभाऊ झांबरे नांदुरा, महादेव मनोहर खोटाळे अकोला, पंढरीनाथ गोपाल देवरे जयपूर, ज्ञानदेव वामन थोरगन भोरटेक, सतीश हरिभाऊ पैसोडे महाल पिंपरी, कैलास भोंडेकार मोताळा, महिला भजनी मंडळ मूर्ती, घनश्याम नारायणदास चांडक मोताळा, दयाराम बोराळे मोताळा, पंजाब राव देशमुख मोताळा, योगेश नवलाखे भक्ती ऑफसेट मोताळा, समस्त गावकरी मंडळी रिधोरा. तर दैनंदिन चहा पाणी नाश्ता शरदचंद्र पाटील मोताळा यांची दैनंदिन अनुक्रमे सकाळ संध्याकाळची शिबिराला मान्यवरांच्या भेटी. आंतरराष्ट्रीय विश्व हिंदू परिषदेचे प्रदेश महामंत्री किशोर दिकोंडवार नागपूर, विभाग उपाध्यक्ष भूपेश पाटील, भोरटेक सेवाधारी मंडळाचे सौ सुभद्रा बाई पंढरी शिराळ, नंदूशेठ बुडुखुले, वासुदेव पाटील, राष्ट्रीय बजरंग दलाचे जिल्हाध्यक्ष सुशांत पाटील, ग्राम स्वराज्य समितीचे कमलाकर पाटील, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार गणेश पाटील, दीपक पाटील, काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष गजानन मामलकर, प्रबोधनकार ॲड. सतीशचंद्र रोठे पाटील, वारकरी परिषदेचे प्रल्हाद मधुकर राऊत, यांच्यासह बहुसंख्य मान्य वरांनी भेटी देत शिबिराला सहकार्य केले.

# अकोल्यातील पाच सराफा दुकानांवर आयकरची धाड

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**




**अकोला :** अकोल्यातील चार ते पाच सराफा दुकानांवर आयकर विभागाने धाड टाकली आहे. ही धाड नापूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील अधिकाऱ्यांनी टाकली आहे. आज (बुधवारी) सकाळपासून ही कारवाई सुरू आहे. अकोला शहरातील चार ते पाच दुकानांवर धाड सुरू आहे. अकोल्यातील पूनम ज्वेलर्स, अग्रवाल ज्वेलर्स, ईशा ज्वेलर्स या दुकांनांची नावे समोर आली आहेत. अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरू आहे. या छापेमारीमुळे शहरातील व्यापारी वर्गात खळबळ उडाली आहे.

**मागील वर्षीही आयकर विभागाची अकोल्यात धाड -** मागील वर्षी मे महिन्यातच आयकर विभागाने अकोल्यात धाड टाकली होती. आयकर विभागाने नांदेड येथे केलेल्या कारवाई नंतर त्यांचा मोर्चा अकोला शहराकडे वळविला होता. नागपूर येथील आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी शहरातील आंगडिया सर्विस एजन्सीच्या कार्यालयासह इतर दोन व्यावसायिक प्रतिष्ठानांवर छापा टाकला.

# मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील कामात मोठा घोटाळा?
## पिसोडा ते इटखेड रस्त्याच्या डांबरीकरणावर ग्रामस्थांचे आरोप
## बुलढाणा कार्यकारी अभियंता कार्यालयातील अधिका-यांचे दुर्लक्ष!

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शेख कदीर भाई.**




**संग्रामपूर :** बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील पिसोडा ते इटखेड दरम्यान मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत करण्यात आलेल्या रस्त्याच्या डांबरी करणात गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सदर रस्ता क्रमांक 161 जी ते इटखेड या मार्गाची एकूण लांबी 5.762 किमी असून यामध्ये एक लहान पूल व 23 मोऱ्यांचा समावेश आहे. मात्र, प्रत्यक्षात 17 मोऱ्यांचेच बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित मोऱ्या अपूर्ण व पडक्या अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे.या रस्त्याचे पिसोडा फाटा ते इटखेड पर्यंत नवीन डांबरी करणाचे काम करण्यात आले आहे. परंतु, अनेक ठिकाणी रस्त्याच्या साईटवर अर्धा इंचही डांबर टाकले नसल्याचे स्पष्ट दिसत असून काम अतिशय निकृष्ट दर्जाचे असल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. या संदर्भात ग्रामपंचायत सदस्य

> **या डांबरीकरण रस्त्याची सखोल चौकशी करून दोषी ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, तसेच रस्त्याचे काम पुन्हा करावे अन्यथा गावकऱ्यांकडून आंदोलन करण्यात येईल.**
>
> **- पिसोडा ग्रामपंचायत सदस्य कैलास कडू विटेवर -**

कैलास कडू विटेवर यांनी दिनांक 28 ऑगस्ट 2024 रोजी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, विश्राम भवन बुलढाणा येथील कार्यकारी अभियंत्या कडे लेखी तक्रार दाखल केली होती.मात्र, सदर तक्रारीकडे दुर्लक्ष करण्यात आले असून आजही गावातील नागरिकांची दिशा भूल केली जात आहे. या रस्त्याच्या निकृष्ट कामामुळे कोट्यवधी रुपयांची सरकारी रक्कम वाया गेल्याची शक्यता असून, बोगस पद्धतीने हे काम पार पाडल्याची चर्चा पिसोडा गावात रंगली आहे.

# अगस्त्य व शौर्य या दोन भावंडाची नेत्रदीप कामगिरी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**मुन्ना ठाकूर.**



**देऊळगाव राजा :** अगस्त्याचा राष्ट्रीय स्तरावरील निवड झालेल्या प्रयोगास तृतीय क्रमांक: पुणे येथील सेंटर स्कूल ऑफ नेचर सायन्सेस एस्ट्रो फिजिक्स विभागातील जीएम आरटी अर्थात जॉईंट मेट्रोवेव्ह रेडिओ टेलिस्कोप विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात देऊळगाव राजा हायस्कूल चा विद्यार्थी अगस्त्य वैशाली बाळकृष्ण तिडके याचा हर्बल मॉस्किटो रिपेलेंट हा डासांवरील प्रति बंधात्मक नैसर्गिक उपायांचा प्रयोग निवडला गेला होता. हा प्रयोग राष्ट्रीय स्तरावर तृतीय क्रमांकाने निवडला गेला आहे. यापूर्वी अगस्त चा प्रयोग राज्य विज्ञान प्रदर्शनामध्ये सादर करण्यात आला होता. दिनांक 20 मे 2025 रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात जीएमआरटीचे सेंटर डायरेक्टर प्राध्यापक यशवंत गुप्त व चेअर पर्सन दिव्या ओबेराय यांच्या हस्ते अगस्तला त्याच्या विशेष उल्लेखनीय प्रयोगासाठी आई वडील व शिक्षकासह प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी त्याचे विज्ञान मार्गदर्शक सुभाष तिडके सरांचा सत्कार करण्यात आला.तिडके परिवारातील छोटे नवाब शौर्य वैशाली बाळकृष्ण तिडके यांनी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत अंडर इलेव्हन वयोगटात प्रथम क्रमांक मिळवला असून बुलढाणा जिल्हा चेस असो सिएशन तर्फे पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी दिनांक 13,14 व 15 जून रोजी बुलढाणा जिल्ह्याच्या वतीने शौर्य जिल्ह्याचे प्रति निधित्व करणार आहे. दिनांक 20 रोजी बुलढाणा येथे झालेल्या या स्पर्धेत जिल्हा भरातून वेग वेगळ्या वयोग टातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यात अकरा वर्षाखालील वयोगटात शौर्याने पाचही फेऱ्या जिंकून जिल्ह्यातून प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. त्याच्या या अतुलनीय कामगिरी बद्दल बुलढाणा जिल्ह्याचे असो सिएशन तर्फे स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र देऊन जिल्हाचे असोसि एशनचे अध्यक्ष सदस्य व पदा धिकाऱ्यांनी यांचा सन्मान केला. त्याच्या कामगिरी बद्दल रायजिंग चेस अकादमी देऊळ गावराजा, त्याचे मार्ग दर्शक सागर भाग्यवंत, शिक्षक व मित्र परिवारा कडून अगस्त्य व शौर्य या दोघांवरही उत्कृष्ट कामगिरी बद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# तालुकास्तरीय महाराजस्व समाधान शिबिरात ग्रामीण व शहरी भागातील अनेक समस्यांचा निपटारा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**योगेश उपाध्ये.**



**कारंजा लाड :** सर्वसामान्यांच्या समस्या तात्काळ सोडविता याव्या या उद्देशाने कारंजा येथील शेतकरी निवास मधील स्व. प्रकाश दादा डहाके सभागृहात बुधवार २१ मे रोजी सकाळी ११ वाजता तालुकास्तरीय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले होते. या कार्य क्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके होत्या.या समाधान शिबिरात प्राप्त १२१ तक्रारी पैकी अनेक तक्रारीचा निपटारा करण्यात आला तर उर्वरीत तक्रारी चौकशीत ठेवून पंधरा दिवसात उत्तर मागविले. आयोजित या महाराजस्व समाधान शिबिरास प्रमुख अतिथी म्हणून उप विभागीय अधिकारी कैलास देवरे, तहसीलदार कुणाल झाल्टे, तालुका कृषी अधिकारी आश्विनी भोसले, गटविकास अधिकारी पूनम राणे, शहरचे ठाणेदार दिनेशचंद्र शुक्ला, ग्रामीणचे ठाणेदार प्रवीण खंडारे, मुख्याधिकारी पंकज सोनोने, नायब तहसीलदार विनोद हरणे व अनिल वाडेकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने शिबिराची सुरुवात करण्यात आली.प्रारंभी कृषी स्वावलंबन योजने अंतर्गत अनुदाना वरील ट्रॅक्टर व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.यावेळी बोलतांना आमदार महोदयांनी सर्व सामान्यांना आपल्या कामासाठी कार्यालय यात खेपा घालाव्या लागणार नाही याची दक्षता प्रशासनाने घ्यावी असे सांगितले. यावेळी प्रत्ये काच्या समस्या आमदार महोदय व प्रशासनाने शांतपणे ऐकून घेऊन निकाली काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी तहसील कार्यालया मार्फत ५० जिवंत सात बारा, १०० उत्पन्नाचे दाखले, २० जातीचे दाखले, १३० सातबारा, १७ ई डब्ल्यू एस प्रमाणपत्र, ४० राष्ट्रीयत्व प्रमाण पत्र, ८ नॉनक्रिमिलर,७ ई रेशन कार्ड, ५ संजय गांधी योजना, ५ श्रावणबाळ, नगर परिषदेच्या वतीने २.५० लाखाचे घरकुल चेक वाटप, पशुसंवर्धन विभागाच्या वतीने दोन लाभार्थ्यांना दुधाळ जनावरे प्रमाण पत्र व इतर योजना च्या १५ लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र देण्यात आले तर एकात्मिक बाल विकास विभागाच्या वतीने माझी कन्या भाग्यश्री या अंतर्गत ६ लाभार्थ्यांना चेक वाटप करण्यात आले आणि कृषी विभागातील २९ प्रकरणांचा यावेळी निपटारा करण्यात आला तसेच तीन ट्रॅक्टर मालकांना चाबीचे वितरण देखील मान्य वरांच्या हस्ते करण्यात आले. आयोजित समाधान शिबिरास तालुक्यातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# धनज येथील कर्जबाजारी शेतक-यांची आत्महत्या

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**



**धनज :** धनज येथील शेतकरी समाधान सुखदेव खिराडे वय (६२) यांनी दि.२१ मे रोजी आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. स्वास्तिक वृत्त असे आहे की मृतक शेतकऱ्यांच्या भावानं दिलेल्या फिर्यादीवरुन त्यांच्या भाव मृतक समाधान सुखदेव खिराडे यांचे नावे धनज बु. शेत शिवरात दोन एकर शेत (शेत सर्वे १४८) आहे. त्यांची नावे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा धनज बु.चे रुपये ५०,००० एवढे कर्ज आहे. गेल्या वर्षी झालेल्या नापिकी यामुळे ते नेहमी आर्थिक विवंचनेत असायचे दोन एकर शेतीच्या उत्पन्नातून एवढ्या मोठा कुटुंबाचा आर्थिक गाळा. कसा चालवायचा व शेतीची मशागत करून पेरणीसाठी पैसे कुठून आणायचा यासारख्या अनेक विवंचनेतून त्यांनी आत्महत्या केल्याच्या तक्रार धनज बु. पोलीस स्टेशन ला दिली आहे. मृतक शेतकऱ्याच्या पश्चात पत्नी दोन मुली एक मुलगा व नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे. या घटनेची नोंद धनज बु. पोलिसांनी घेतली असून पुढील तपास करीत आहे.

# पत्रकार गजानन बानोरे समाजसेवा पुरस्काराने सन्मानित

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

**रिसोड :** तालुक्यातील नेतंसा येथील छत्रपती संभाजी महाराज जयंती निमीत्त मराठा स्नेहसंवर्धक मंडळाच्या वतीने व रामतीर्थ संस्थानचे वतीने मराठा मेळावा व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन १८ मे रोजी करण्यात आले होते. या सोहळ्याचे उद्घाटक म्हणून केंद्रीय आयुष्य स्वतंत्र प्रभार तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव होते. तर स्वागताध्यक्ष पदी डॉ. राम शिंदे, कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठा समाज भूषण डॉ. भूषण मापारी, उद्योजक देवेंद्र खडसे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नारायणराव काळबांडे, आ. अमित झनक, ज्योतीताई गणेशपुरे, रा. कॉं. प्रदेश उपाध्यक्ष भास्करराव काळे, डॉ. गजानन बाजड, डॉ. अजय पाटील, वसंतराव घाडवे, प्राचार्य वसंतराव अवचार यांच्यासह अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते. याप्रसंगी विविध समाजातील सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांचा व नागरिकांचा मान्यवरांच्या हस्ते शिल्ड व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. पत्रकार गजानन बानोरे हे गेल्या ३५ वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असल्याबद्दल त्यांना डॉ. राम शिंदे व डॉ. भूषण मापारी यांच्या हस्ते "समाज सेवा" पुरस्काराचे शिल्ड व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन विनोद बोरे तर आभार दिनकर बोडखे यांनी मानले.

# बुलढाण्याच्या कायदा-सुव्यवस्थेच्या नव्या पर्वाची सुरुवात
## निलेश तांबे बनले जिल्ह्याचे नवे पोलिस अधीक्षक

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शेख कदीर भाई.**



**बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्याच्या पोलिस खात्यात एक मोठा बदल होत असून, जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक म्हणून कार्यरत असलेले श्री. विश्व पानसरे यांची बदली झाली आहे. त्यांच्या जागी आता कार्यकुशल, लोका भिमुख आणि कणखर प्रशासनाची ओळख असलेले आयपीएस अधिकारी श्री. निलेश तांबे हे जिल्ह्याचे नवे पोलिस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारणार आहेत. राज्याच्या गृह विभागाने याबाबत अधिकृत आदेश जारी केले आहेत.विश्व पानसरे यांची कार्यशैली ठरली प्रेरणादायी पानसरे यांनी आपल्या कार्य काळात गुन्हेगारी नियंत्रण, अंमली पदार्थविरोधी मोहीम, महिला व बालकांच्या सुरक्षेचे उपक्रम, वाहतूक सुधारणा, सायबर गुन्ह्यांवरील उपाय योजना यामध्ये विशेष भर दिला. "पोलीस तुमच्या दारी" हा उपक्रम प्रभावीपणे राबवून त्यांनी पोलिस दल आणि सामान्य नागरिक यांच्यातील दरी कमी केली. शांतता आणि कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील.नवीन एसपी निलेश तांबे – 'कठोर निर्णय, पारदर्शक प्रशासन' यांचा प्रतीकनवीन पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे हे यापूर्वी विविध जिल्ह्यांमध्ये गुन्हेगारीला आळा घालणारे, भ्रष्टाचार विरोधी कठोर कारवाया करणारे, तरुणांमध्ये नशा विरोधी जनजागृती करणारे आणि महिलांच्या सुरक्षेकरिता विशेष मोहिमा राबवणारे अधिकारी म्हणून प्रसिद्ध आहेत. प्रशासनात पारदर्शकता, कायद्याच्या अंमल बजावणीतील कठोरपणा आणि लोकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याच्या त्यांच्या शैलीमुळे ते राज्यात सर्वत्र प्रसिद्ध आहेत. नव्या एसपींकडून जनतेला अपेक्षा मोठ्या जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी, तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण, ग्रामीण भागातील पोलीस यंत्रणेचे सशक्ती करण, वाहतूक सुधारणा, महिला सुरक्षा याबाबत जिल्ह्याच्या जनते कडून मोठ्या अपेक्षा आहेत. श्री. तांबे यांच्या नेतृत्वाखाली बुलढाणा जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेच्या नव्या पर्वाची सुरुवात होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे. लवकरच पदभार स्वीकारणार श्री. निलेश तांबे साहेब लवकरच बुलढाण्यात दाखल होऊन पोलिस अधीक्षक म्हणून अधिकृत पदभार स्वीकारणार असून, त्यांचे स्वागत करण्यासाठी प्रशासन, राजकीय आणि सामाजिक वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.बुलढाणा सज्ज आहे त्यांच्या प्रभावी नेतृत्वा साठी!